# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 17.12.2025** **वार- बुधवार**

---

**मंत्रिमंडळ-निर्णय**

राज्यातील गड-किल्ल्यांप्रमाणेच राज्य संरक्षित स्मारकांच्या ठिकाणांवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयानुसार गड-किल्ल्यांवरील अतिक्रमणे काढण्याबाबतच्या तरतूदींची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. यामध्ये आता राज्य संरक्षित स्मारकांचाही समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**अपार आयडी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च 2026 मध्ये इयत्ता दहावी-बारावीच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. या परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची डिजिलॉकरमध्ये निकाल पत्रिका उपलब्ध व्हावी, यासाठी अपार आयडी नोंदणी करणे आवश्यक आहे. सर्व शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा अपार आयडी उपलब्ध करून त्याची नोंद राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर करावी, अशा सूचना राज्य मंडळाचे सचिव दीपक माळी यांनी दिल्या आहेत. डिजीलॉकरमुळे विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांचे कायमस्वरूपी डिजिटल रेकॉर्ड तयार होऊन वेगवेगळ्या शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश तसंच सरकारी शिष्यवृत्ती आणि योजनांमध्ये लाभ मिळणे सुलभ होते.

**ऊस गाळप हंगाम**

राज्यात सध्या 91 सहकारी आणि 93 खासगी मिळून 184 साखर कारखान्यांचा ऊस गाळप हंगाम सुरू आहे. यामध्ये 80 लाख मेट्रिक टनाइतके सर्वाधिक ऊस गाळप पूर्ण करून पुणे विभागाने आघाडी घेतली तर 77 लाख मेट्रिक टन गाळपासह कोल्हापूर विभाग ऊस गाळपात दुसऱ्या स्थानी आहे.

**आय.पी.यात्रा**

केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय आणि ए.आय.सी. पिनॅकल आंत्रप्रेन्युअरशीप फोरम यांच्यातर्फे 19 आणि 20 डिसेंबर रोजी पुण्यात दोन दिवसीय तिसऱ्या राष्ट्रीय बौद्धिक संपदा यात्रेचं आयोजन करण्यात आलं आहे. येत्या शुक्रवारी, 19 तारखेला सकाळी, या यात्रेचं उद्घाटन होणार आहे. 'विकसित भारत 2047 साठी बौद्धिक संपदा-आधारित अर्थव्यवस्था उभारणी' अशी या यंदाच्या आय. पी. यात्रेची मध्यवर्ती संकल्पना आहे.

**आम आदमी**

पुणे महापालिकेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवणे मुलाखती घेणे असे कार्यक्रम सर्व पक्षांकडून चालू असताना आम आदमी पक्षानं आज 25 उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. पक्षाचे शहराध्यक्ष सुदर्शन जगदाळे आणि धनंजय बेनकर यांनी आज पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.

**आचारसंहिता**

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका कार्यक्षेत्रात आतापर्यंत 4 हजार 819 नियमबाह्य तसेच अनधिकृतपणे लावण्यात आलेले राजकीय फलक, चिन्हे, ध्वज, भिंतीवरील राजकीय जाहिराती इत्यादि गोष्टी हटविण्यात आल्या आहेत. महापालिकेच्या आकाशचिन्ह आणि परवाना विभागाच्या वतीनं ही कारवाई सुरू करण्यात आली आहे.

शहरातील प्रमुख चौक, मुख्य रस्ते, सार्वजनिक ठिकाणं तसेच शासकीय इमारतींच्या परिसरात लावण्यात आलेले अनधिकृत, नियमबाह्य जाहिरात फलक हटविण्याची मोहीम युद्धपातळीवर राबविण्यात येत आहे. ही कारवाई करताना संबंधित राजकीय पक्ष, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी महापालिकेला सहकार्य करावे, तसेच पुढील काळात कोणत्याही स्वरूपात आचारसंहितेचा भंग होईल असे साहित्य लावू नये, असे आवाहन महापालिकेच्या वतीनं करण्यात आलं आहे.

**निवडणूक-नियुक्ती**

राज्य निवडणूक आयोगाकडून महापालिका सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम 15 डिसेंबर रोजी जाहीर करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी बहुसदस्यीय पद्धतीनं 32 प्रभागातील 128 जागांसाठी निवडणूक होणार असून 15 जानेवारीला प्रत्यक्ष मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी 8 निवडणूक निर्णय अधिकारी आणि 24 सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे आदेश आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी जारी केले आहेत.

**विकसित भारत**

विकसित भारतामध्ये प्रगत तंत्रज्ञान, बांधकाम आणि पायाभूत सुविधा क्षेत्राचं  मोलाचं योगदान राहणार आहे, असं प्रतिपादन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर सुनील भिरूड यांनी काल केलं. बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या  पुणे सेंटरतर्फे' विकसित भारत 2047: बांधकाम आणि पायाभूत सुविधा क्षेत्राचे योगदान' या विषयावरील ज्ञानसत्रात डॉ. भिरूड पुण्यात बोलत होते.  बांधकाम क्षेत्रानं सर्वोच्च दर्जाची गुणवत्ता जपावी असं भिरुड यांनी यावेळी सांगितलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज किमान 10 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं. उद्याही 10 अंशाच्या आसपास तापमान राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता. ताज्या पुणे वृत्तांतसह नमस्कार.**